# जनतेचा लोकमानस

मुख्य संपादक : गितेंद्र कमळाकर मिर्लेकर

वर्ष १ ले | अंक सहावा | पृष्ठे ८ | ११ ते १७ डिसेंबर २०२५ | मूल्य २ रुपये | www.jantechalokmanas.com PRGI Reg. No. : MHMAR/25/A3265




एक गाव
एक पाणवठ्याचा
राखणदार गेला...

२




# रॅपिडो ॲपद्वारे वसई-विरारमध्ये अवैध बाईक टॅक्सी सेवा ; कंपनीवर गुन्हा, प्रवाशांना धोका

**प्रतिनिधी :** मुंबई उपनगरातील वसई-विरार परिसरात रॅपिडो ॲपद्वारे चालवल्या जाणाऱ्या बाईक टॅक्सी सेवांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने (आरटीओ) रॅपिडो कंपनीवर अवैध प्रवासी वाहतूक करण्याबद्दल गुन्हा दाखल केला असून, प्रवाशांना ही सेवा वापरू नये असा इशारा दिला आहे. परवानगीशिवाय खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करणे हा मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन असल्याने या सेवेविरोधात सतत कारवाया होत आहेत. या प्रकरणाने स्थानिक ऑटो आणि रिक्षा चालकांमध्येही असंतोष वाढला आहे.

**पार्श्वभूमी आणि कारवाईचा तपशील**

वसई प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नुकतीच (५ डिसेंबर २०२५) रॅपिडो कंपनीच्या रोपेन ट्रान्सपोर्ट प्रा. लि. या भागीदारावर गुन्हा दाखल केला. कंपनीने आरटीओची कोणतीही परवानगी न घेता ॲपद्वारे बाईक टॅक्सी सेवा सुरु केली होती, ज्यामुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली. परिवहन विभागाने स्पष्ट केले की, रॅपिडोला दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करण्याची कोणतीही मंजुरी दिलेली नाही. या सेवेमुळे रस्त्यावरील वाहतुकीचा अनियंत्रित वाढ आणि अपघातांचा धोका वाढला आहे.

आरटीओ अधिकाऱ्यांनी सांगितले की, वसई-विरार शहरात रॅपिडोच्या बाईक टॅक्सींमुळे रिक्षा थांब्यांवर लांबलचक रांगा लागत आहेत आणि प्रवाशांना अवाजवी दर भरावे लागत आहेत. जलद प्रवास आणि कमी दराच्या बहाण्याने ही सेवा लोकप्रिय झाली असली तरी, ती पूर्णपणे बेकायदेशीर आहे. गुन्हा दाखल करताना मोटार वाहन कायदा कलम १९२ (अ) (परवानगीशिवाय वाहतूक) आणि इतर संबंधित कलमांखाली कारवाई करण्यात आली. कंपनीला नोटीस बजावण्यात आली असून, पुढील तपास सुरु आहे.

या आधी, जून २०२५ मध्ये मुंबई आरटीओने रॅपिडो आणि उबर बाईक टॅक्सींवरही अशीच कारवाई केली होती. त्या वेळी तक्रारींनुसार, परवानगीशिवाय अवैध वाहतूक

पान क्र. ६ वर

# वसई-नालासोपारा-विरार परिसरातील चोरीला गेलेल्या ७ स्प्लेंडर आणि १ बुलेट मोटारसायकल जप्त आरोपीला पुण्यातून अटक माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी



**प्रतिनिधी :** वसई, नालासोपारा आणि विरार परिसरात स्प्लेंडर आणि बुलेट मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकाने एका आरोपीस मोठ्या शिफारतीने अटक केली आहे या कारवाईत पोलिसांनी ७ स्प्लेंडर आणि १ बुलेट मोटारसायकल जप्त केल्या असून, एकूण ७ गुन्ह्यांचा छडा लागला आहे.जप्त वाहनांची एकूण किंमत ५ लाख ३० हजार रुपये इतकी आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, माणिकपुर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान एक स्प्लेंडर मोटारसायकल चोरीची घटना घडली होती. तक्रारदार विमलेश गोपीचंद तिवारी यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. मुरबाड (ठाणे) आणि दादर (मुंबई) पर्यंत सुमारे ६०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा तपास करून पोलिसांनी आरोपीचा माग काढला असता आरोपी अविराज सुनिल गायकवाड (वय ३१, रा. उंब्रज, ता. जुन्नर, जि. पुणे) याला त्याच्या राहत्या घरून ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने चोरीच्या वाहनांची माहिती दिली, ज्यामुळे पोलिसांनी सर्व वाहने जप्त केली. या कारवाईमुळे माणिकपुर, नालासोपारा, विरार आणि बोलिंज पोलिस ठाण्यांतील एकूण ७ गुन्हे उघडकीस आले आहेत.

हि कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी (पोलिस उपायुक्त - परिमंडळ २), नवनाथ घोगरे (सहाय्यक पोलीस आयुक्त वसई), हरिलाल जाधव (वरिष्ठ पोलिस निरीक्षक), दुर्गा चौधरी (पोलिस निरीक्षक -गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सुनील पाटील, पोलिस हवालदार शामेश चंदनशिवे, रामदास भुजबळ, पोलिस अमलदार मंगेश जगताप, गोविंद लवटे, आनंदा गाडदे, प्रवीण कांदे, व पोलीस उपयुक्त कार्यालय परिमंडळ २ चे पोलीस हवालदार भालचंद्र बागुल, पोलिस अमलदार अमोल बेर्डे आदींनी मोलाची भूमिका बजावली.

पोलिसांनी या प्रकरणी आणखी तपास सुरू ठेवला असून, वाहन चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी सतर्कता वाढवली आहे.

# भाजपाची उलटी गिनती सुरु झाली आहे - विलास पोतनीस

## शेकडो कार्यकर्त्यांनी हाती बांधले शिवबंधन



**प्रतिनिधी :** वसई विरार महानगरपालिकेच्या निवडणूकीची तारीख आता केव्हाही येऊ शकते म्हणून जेथे चार आठवड्यांचा अधिवेशन असतो तेथे सत्ताधाऱ्यांनी फक्त एकाच आठवड्याचे अधिवेशन ठेवले आहे. त्यामुळे अधिवेशन संपताच निवडणुकीच्या तारखा जाहीर होतील पण भाजपने राज्य आणि देशात जी काही दादागिरी चालवली आहे ती आता संपत चालली आहे. भाजपाची आता उलटी गिनती सुरु झाली आहे असे रोखठोक मत पालघर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार विलास पोतनीस व्यक्त केले .

विरार पश्चिम येथे सोमवार ८ डिसेंबर रोजी शिवसेना (उबाठा) चा भव्य पक्षप्रवेश आयोजित करण्यात आला होता. यावेळी वेगवेगळ्या पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवबंधन हाती बांधले.

उप तालुकाप्रमुख नरेश वैद्य आणि शहर प्रमुख विवेक पवार यांनी या पक्षप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पुढे बोलताना पोतनीस म्हणाले की, भाजप साम-दाम-दंड-भेद वापरुन सत्ता आपल्या हाती ठेवत आहे. यासाठी त्यांनी सर्व प्रशासकीय संस्थेवर आपले वर्चस्व निर्माण केले आहे. म्हणून आता गाफील राहू नका, प्रत्येक ठिकाणाहून हजारोच्या संख्येने दुबार मतदार मिळत आहे त्यामुळे मतदार यादी महत्त्वाची आहे. मतदार यादी चेक करावे असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

यावेळी जिल्हा प्रमुख प्रवीण म्हाप्रळकर, लोकसभा संघटक जनार्दन पाटील, विवेक पाटील, तालुका प्रमुख प्रथमेश राऊत, किरण फडणीस, तालुका सचिव संजय राऊत, शहर संघटक वंदना नांदविकर, विनायक नांदविकर, विनायक सामंत, शहर प्रमुख उदय जाधव यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नालासोपाऱ्यात १५०० रुपयांत गर्भपाताच्या गोळ्या, वविशमपाच्या आरोग्य विभागाची धडक कारवाई



**प्रतिनिधी :** नालासोपारा पूर्वेतील धानीव बाग येथील शाहीन क्लिनिकवर वसई-विरार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने मोठी कारवाई केली. मान्यता नसताना बेकायदेशीरपणे गर्भपाताच्या गोळ्या देणाऱ्या डॉ. जबीउल्ला खान (बीएएमएस) याच्यावर पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पालिकेच्या आरोग्य विभागाला गुप्त माहिती मिळाली की, जबीउल्ला खान हा स्त्रीरोगतज्ञ नसतानाही फक्त १५०० रुपयांत गर्भपाताच्या गोळ्या पुरवत होता. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कृष्णा गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली ८ डिसेंबर रोजी डमी रुग्ण पाठवून तपासणी केली असता हे प्रकरण उघडकीस आले.

पान क्र. ३ वर

## एक गाव एक पाणवठ्याचा राखणदार गेला...

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे निधन



**प्रतिनिधी :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे सोमवार ८ डिसेंबर रोजी रात्री ८.२५ वाजता वयाच्या ९५ व्या वर्षी पुणे येथे निधन झाले. ते कष्टकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जात. त्यांनी हमाल पंचायत या संघटनेची स्थापना करून आयुष्यभर असंघटित कामगारांच्या न्याय हक्कांसाठी लढा दिला.

डॉ. बाबा आढाव यांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा खोलवर प्रभाव होता. त्यातूनच जातीय भेदभावाला विरोध म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर एक गाव एक पाणवठा ही चळवळ चालवली.

बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळी आणि कष्टकरी वर्गाचे जीवन दर्शवणारे महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या प्रमुख पुस्तकांमध्ये **एक गाव - एक पाणवठा**, त्यांचे आत्मचरित्रात्मक लेखन **मीच तो माणूस** आणि **एक साधा माणूस**, **जगरहाटी, रक्ताचं नातं, असंघटित कामगार: काल, आज आणि उद्या, जातपंचायत: दाहक वास्तव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन** ही काही महत्त्वाची पुस्तके लिहिली आहेत. या पुस्तकांनी वाचकांच्या मनावर खोल प्रभाव पाडला. बाबा आढाव यांच्या समाज कार्यात या पुस्तकांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

बाबा आढाव यांच्या निधनावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हमाल पंचायत, एक गाव-एक पाणवठा असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले. सामाजिक कुप्रथांविरोधात त्यांनी दिलेला लढा हा कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राला समाजसेवकांची एक थोर परंपरा कायमच लाभली. त्या परंपरेतील एक मौलिक व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले. ते कायम स्मरणात राहतील, त्यांचे विचार येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहतील, अशा शब्दात फडणवीसांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार यांनीही बाबा आढाव ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलंय, ठआपल्या महाराष्ट्रात प्रागतिक, कृतीशील विचार मांडून ते आचरणात आणणाऱ्या शिलेदारांची एक मोठी फळी आहे. भूमिका घेताना परिणामांची, प्रस्थापित व्यवस्थेच्या रोषाची तमा न बाळगणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ज्येष्ठ समाजसेवक, पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक डॉ. बाबा आढाव ह्यांचं नाव आवर्जून घ्यावं लागेल.

त्यांच्या निधनाचं वृत्त समजलं तेव्हा त्यांचा संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा सारा पट डोळ्यासमोरून गेला. 'एकाकी मजदूर' चळवळ, कामगारांच्या हक्कांसाठीची त्यांची अखंड झुंज, समतेवर आधारित समाजरचनेचा त्यांचा ठाम निर्धार अशा सर्व भूमिकांमधून ते सतत प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देत राहिले.

आजच्या सामाजिक दृष्ट्या अस्थिर, विषमतेने, विद्वेषाने ग्रासलेल्या काळात बाबा आढाव ह्यांच्यासारख्या निडर, विचारांशी बांधिलकी ठेवून काम करणाऱ्या विभूतींची उणीव सदैव भासत राहील, असंही शरद पवारांनी नमूद केलं.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून आदरांजली









**प्रतिनिधी** : देशभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा झाला. ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी या महामानवाने अखेरचा श्वास घेतला त्या क्षणापासून ते आजपर्यंत लाखो-कोट्यवधी हृदयांमध्ये ते जिवंत आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा आणि समता-स्वातंत्र्य-बंधुता यांचा संदेश आजही समाजाला दिशा देत आहे.

पालघर तालुका मध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन शोकाकुल वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी ठिकठिकाणी पांढरे वस्त्र परिधान करून कँडल मार्च काढण्यात आले.

अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात महापरिनिर्वाणदिनानिमित्त शिक्षक कक्षात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते प्रा. प्रदीप पाटील यांनी **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा आणि आपण** या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रा. पाटील यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता यांसारखी संवैधानिक मूल्ये नसल्यास अराजक उरेल, असे मत व्यक्त केले. तसेच, त्यांनी आंबेडकरांच्या विचारांची सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक संदर्भातील प्रस्तुतता स्पष्ट केली. या अभिवादन सभेला महाविद्यालयातील विविध विभागांचे शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीची जाणीव जागृत करण्यात आली.

पालघरमधील कला शिक्षक कौशिक जाधव यांनी तांदळाच्या भाकरीवर बाबासाहेबांची कलाकृती साकारत त्यांना अनोखी मानवंदना दिली. वॉटर कलरचा वापर करून त्यांनी बाबासाहेबांची प्रतिमा रेखाटली आहे. **तुमी खाता त्या भाकरीवर, बाबासायबाची सही हाय रं** याच गीताच्या आधारे कौशिक जाधव यांनी भाकरीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा साकारली.

विरार पश्चिम येथील म्हाडा वसाहतीमध्ये आंबेडकरी विचार मंच या संस्थेच्या वतीने देखील महापरिनिर्वाण दिन आयोजित केला होता. ५ डिसेंबर च्या रात्री विभागातील समाज बांधवानी हाती मेणबत्ती घेऊन कँडल मार्च काढला. यावेळी विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते देखील हजर होते . बोळींज पोलीस ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे, विवा कॉलेज चे मेहुल ठाकूर, शिवसेना (उबाठा) चे शहर प्रमुख विवेक पवार, शिवसेना (शिंदे) चे शहर प्रमुख रोहन चव्हाण, महिला संघटक अश्विनी रोहन चव्हाण, ग्राहक सेवा संस्था चे संस्थापक अध्यक्ष तथा जनतेचा लोकमानस चे मुख्य संपादक गितेंद्र मिर्लेकर आदी मान्यवर उपस्थित होते .

विरार पश्चिम मधील तिरुपती नगर, सम्राट अशोक नगर, ग्लोबल सिटी, विराट नगर, सेंट्रल पार्क, बोळींज, आगाशी, अर्नाळा, पूर्व येथील साईनाथ नगर, चंदनसार, नारंगी, नालासोपारा येथील आंबेडकर नगर, सिद्धार्थ नगर, वसई येथील आंबाडी रोड आदी ठिकाणांहून रॅली अभिवादन सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.

## ग्राहकांच्या हक्कांसाठी १३ वर्षांपासून अविरत लढणाऱ्या ग्राहक सेवा संस्थेचा १२ डिसेंबर रोजी १३ वा वर्धापन दिन

**प्रतिनिधी** : संपूर्ण महाराष्ट्रभर काम करणाऱ्या आणि ग्राहकांच्या न्याय हक्कांसाठी गेल्या १३ वर्षांपासून सातत्याने लढा देणाऱ्या ग्राहक सेवा संस्था या स्वयंसेवी संस्थेचा १३ वा वर्धापन दिन येत्या १२ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात साजरा होणार आहे.

२०१२ साली स्थापन झालेल्या या संस्थेने आजपर्यंत हजारो ग्राहकांना बँकिंग, विमा, रिअल इस्टेट, वीज बिल, दूरध्वनी, गॅस, वाहन सेवा, ऑनलाइन फसवणूक, खराब माल-उत्पादन अशा विविध क्षेत्रांतील तक्रारींचे निवारण करून दिले आहे. ग्राहक न्याय मिळवून दिला आहे. विशेष म्हणजे, संस्थेने ग्राहक न्यायालये, राज्य व राष्ट्रीय ग्राहक आयोग, लोकपाल, आरबीआय ओम्बड्समन, इरडा ओम्बड्समन यांच्यापर्यंत प्रभावीपणे केसेस लढवून लाखो रुपयांची परतफेड व नुकसानभरपाई ग्राहकांना मिळवून दिली आहे. संस्थेचे आज संस्थेच्या वसई, नालासोपारा, विरार, पालघर, मुंबई तसेच महाराष्ट्रभर शाखा आणि शेकडो कार्यकर्ते कार्यरत आहेत. ग्राहक हा राजा आहे, पण त्याला त्याच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे काम आम्ही करतो. गेल्या १३ वर्षांत आम्ही एकट्याने नाही तर संपूर्ण टीमने ग्राहकांना न्याय मिळवून देण्याचे अविरत कार्य केले आहे, असे गितेंद्र मिर्लेकर यांनी सांगितले.

## नालासोपाऱ्यात १५०० रुपयांत गर्भपाताच्या गोळ्या, वविशमपाच्या आरोग्य विभागाची धडक कारवाई

**पान क्र. २ वरुन**

क्लिनिकमध्ये बेकायदेशीर गर्भपाताच्या गोळ्यांचा मोठा साठाही जप्त करण्यात आला.

याप्रकरणी जबीउल्ला खान याच्याविरुद्ध भा.जु.सं. कलम ३१८ (४) तसेच मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी ॲक्टच्या कलम ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वसईतही सोनोग्राफी केंद्र सील**

त्याचवेळी वसईतील ईश्वर्या हेल्थकेअर प्रा. लि. या सोनोग्राफी केंद्रावरही छापा टाकण्यात आला. पीसीपीएनडीटी कायद्याचे घोर उल्लंघन करत असल्याचे आढळल्याने १ डिसेंबर रोजी केंद्रातील अल्ट्रासोनोग्राफी मशीन व मुद्देमाल जप्त करून सील करण्यात आले आहे. या केंद्राविरुद्धही कायदेशीर कारवाई सुरू आहे.

आरोग्य विभागाच्या समुचित प्राधिकाऱ्या डॉ. भक्ती चौधरी यांनी सांगितले की, "बेकायदेशीर गर्भलिंग निदान व गर्भपात करणाऱ्या केंद्रांवर सतत धडक कारवाया सुरू राहतील. नागरिकांना अशा केंद्रांची माहिती गोपनीय राहील याची खात्री देत हेल्पलाइनवर (१८००-२३३-४४७५ किंवा १०४) कळवावे."

या सलग कारवायांमुळे नालासोपारा-वसई परिसरातील अवैध आरोग्य केंद्रांचा पर्दाफाश होत असून, पालिकेच्या तडाखेबंद भूमिकेला नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे.

# छोट्या जाहिराती


## नोकरीविषयक

**विरार पश्चिम**, बोळींज पोलीस ठाणे समोर खानावळीमध्ये काम करण्यासाठी बाई पाहिजे. संपर्क साधा : 8483085138

---

**विरार पश्चिम**, येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी बाई पाहिजे. संपर्क साधा : 8446079233

---

**मुखवासच्या दुकानात** काम करण्यासाठी मुलगा पाहिजे. संपर्क साधा : 9890039866

## जागाविषयक

**विरार पूर्व आणि पश्चिम** फ्लॅट, शॉप, बंगलो, रो-हाऊस, जमिन विकत किंवा भाडेतत्त्वावर देण्यासाठी एकमेव विश्वासाचे नाव. अधिक माहितीसाठी संपर्क साधा : 8169096304 / 9930147022

## पाहिजेत

साप्ताहिक जनतेचा लोकमानस

या विरारमधून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रासाठी अनुभवी

**जाहिरात प्रतिनिधी**

वसई - विरार - नालासोपारा पालघर - डहाणू येथील बातम्यांसाठी

**वार्ताहर**

इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडेटा खालील इमेल अथवा व्हॉट्सअप पाठवा

editor@jantechalokmanas.com

9082067601

## जाहिरातविषयक

ALL YOUR PRINTING SOLUTION

BANNER / FLEX PRINTING

Eco Vinyl Stickers / One Way Vision

Signages / Sunboard

Backlight Board / Neon Light

Acrylic Letter / Name Plate

GI Standee / Rollup Standee

Visiting Card / Brochure / Flyer

Menu Card / Invitation Card

matrix ads

Call 9082067601

www.matrixadvertising.in

## व्यवसायविषयक

॥ जय मित्र ॥ ॥ जय तुलसी ॥ ॥ जय महालक्ष्मण ॥

श्री मुंबई मुखवास सेंटर

MUMBAI MUKHWAS CENTER

GSTIN No. : 27AIDPN6491R1ZC



नरेंद्र : 9890039866 / 9665008072

शॉप नं. १, ओ विंग, श्री सिध्दी हाईट्स, एस.डी.आर.सी. लॅब के पिछे, बोळींज रोड, विरार (पश्चिम), ४०१३०३

।। श्री स्वामी समर्थ ।।

N & T

FAST FOOD CORNER

एन ॲण्ड टी फास्ट फूड कॉर्नर



Shop No 13, B Wing, Shree Siddhi Height CHS, Near MHADA Colony Ground, Bolinj Road, Virar West

CALL : 9833805867


## सुडोकू सोडवा

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | | | | | 8 | |
| | | | 9 | 3 | | | | |
| | | | | 7 | | | | |
| | | 1 | 7 | 9 | 2 | | | |
| 6 | | 3 | | | | | 7 | |
| | | 8 | | | | 1 | | |
| | 7 | 9 | 2 | 5 | | 4 | | |
| 3 | | | | 1 | | | 6 | 7 |
| | | | | | | 5 | | |

# विरार रेल्वे स्टेशनवर प्लॅटफॉर्म विस्तार प्रकल्प गर्दीवर उपाययोजना, १५ कोच लोकल सुरू




**प्रतिनिधी :** पश्चिम रेल्वेच्या विरार-डहाणू मार्गावर दररोज लाखो प्रवाशांना सोयी-सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासनाने प्लॅटफॉर्म विस्तार प्रकल्पाला गती दिली आहे. या प्रकल्पामुळे विरार स्टेशनवरील फलाटावरील गर्दी दुप्पट कमी होईल आणि १५ कोच असलेल्या लांब लोकल ट्रेनांचे संचालन सुलभ होईल. मुंबई रेल्वे विकास महामंडळ (MRVC) आणि पश्चिम रेल्वेच्या संयुक्त विद्यमाने चालवला जाणारा हा प्रकल्प सध्या ३५% पूर्ण झाला असून, २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या कामामुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि आरामदायी प्रवास मिळेल.

विरार स्टेशन हे पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय नेटवर्कमधील एक प्रमुख टर्मिनस आहे, जेथे दररोज ५ लाखांहून अधिक प्रवासी उतरत-चढतात. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीमुळे फलाटांवर अनियंत्रित गर्दी, अपघातांचा धोका आणि ट्रेन विलंब होत असल्याने रेल्वे प्रशासनाने हा विस्तार प्रकल्प हाती घेतला. मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे:

**नवीन प्लॅटफॉर्म 5A:** ५ डिसेंबर २०२५ रोजी सुरू झालेला हा प्लॅटफॉर्म उत्तर-पश्चिम दिशेला विकसित केला जात आहे. त्याची रुंदी ५ मीटर असून, यामुळे १५ कोच असलेल्या ट्रेनांना पूर्णपणे समर्थन मिळेल. हा प्लॅटफॉर्म येणाऱ्या स्टेशन डेकशी थेट जोडला जाईल, ज्यामुळे प्रवाशांना वर-खाली चढण्याची गरज कमी होईल.

**प्लॅटफॉर्म 3A आणि 4A चे चौडीकरण:** सध्याच्या ६.८ मीटर रुंदीला ३.५ मीटर वाढवून एकूण १०.३ मीटर केले जात आहे. यामुळे प्रवाशांची वाहतूक क्षमता दुप्पट होईल आणि गर्दी कमी होईल. विरार-डहाणू रोड मार्गावरील चौपदरीकरण प्रकल्प (६४ किमी लांबीचा) अंतर्गत ७ नवीन स्टेशन उभारली जाणार आहेत: वाधिवा, सरतोडी, माकुणसर, चिंटुपाडा, पांचाली, वंजारवाडा आणि BSES कॉलनी. ही स्टेशन ग्लास फॅसेड, एस्केलेटर, फूड कोर्ट आणि ओपन स्पेससह आधुनिक स्वरूपाची असतील. प्रकल्पाची एकूण किंमत ३,५७८ कोटी रुपये असून, आतापर्यंत ४१% काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पामुळे विरार-डहाणू मार्गावरील ट्रेन संचालनात ३०% वाढ होईल आणि प्रवाशांना 'थर्ड मुंबई' सारख्या विकास योजनांचा लाभ मिळेल. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, कामादरम्यान तात्पुरते व्यत्यय येतील, पण दीर्घकाळासाठी हा फायदेशीर ठरेल.

**गर्दी कमी:** फलाटांची रुंदी वाढल्याने प्रवाशांना जागा मिळेल आणि सुरक्षित उतरणे-चढणे शक्य होईल.

**ट्रेन विलंब कमी:** १५ कोच ट्रेन सुरू झाल्याने क्षमता वाढेल आणि विलंब २०% कमी होईल.

**आधुनिक सुविधा:** नवीन स्टेशनमध्ये एस्केलेटर, लिफ्ट, सीसीटीव्ही आणि फूड प्लाझा असतील.

**पर्यावरणीय फायदा:** चौपदरीकरणामुळे रेल्वे वाहतुकीला प्राधान्य मिळेल आणि रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी होईल.


जनतेचा लोकमानस

प्रकाशक व मुख्य संपादक : गितेंद्र कमळाकर मिर्लेकर

संपादक : कपिल जानु मोहिते

सजावट व मांडणी : मॅट्रिक्स ॲडस्

मुद्रक व मुद्रणालय : हरिश्चंद्र सहदेव धुरी (प्रचिता प्रिंट्स)

ई/१०३, अमित अपार्टमेंट, आकांक्षा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीबेन छेडा रोड, निळेमोरे, नालासोपारा (पश्चिम) ४०१२०३

कार्यालय व प्रकाशन स्थळ

रुम नं. २३०३, बिल्डिंग नं. ४, डी विंग, म्हाडा कॉलनी, विरार नालासोपारा लिंक रोड, ता. वसई, जिल्हा पालघर, ४०१३०३

संपर्क : 9082067601, ईमेल : editor@jantechalokmanas.com

# आदिवासी विकास विभाग प्रकल्पस्तरीय क्रीडा महोत्सवाचा उत्साहपूर्ण शुभारंभ




**प्रतिनिधी :** डहाणू आदिवासी विकास विभागांतर्गत आयोजित प्रकल्पस्तरीय क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ सोमवारी तारीख ९ डिसेंबर रोजी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, सवणे येथे पार पडला.

या महोत्सवात तब्बल २,२०० खेळाडूंनी (१,२०० मुले आणि १,००० मुली) सहभाग नोंदवला आहे, जो बदलत्या सामाजिक दृष्टिकोनाचा सकारात्मक संदेश देतो. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव होत आहे. स्पर्धा १४, १७ आणि १९ या तीन वयोगटांत ९ ते ११ डिसेंबर दरम्यान रंगणार आहेत.

क्रीडा ही स्पर्धा नसून व्यक्तिमत्त्व घडवणारी संस्कारयात्रा आहे. पराभव हा शेवट नसून नव्या सुरुवातीचे पाऊल आहे, असा प्रोत्साहनपर सल्ला विशाल खत्री यांनी या वेळी दिला. खेळाडूंसाठी निवास, भोजन, आरोग्यसेवा अशा सर्व सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. हा महोत्सव आदिवासी मुला-मुलींमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. उद्घाटन सोहळ्यास प्रकल्पातील वरिष्ठ अधिकारी, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

# अपंग स्टॉलधारकांचे महापालिका आवारात ठिय्या आंदोलन; "नगरपरिषदेच्या काळात मंजूर स्टॉल तोडू नका, परवाना नूतनीकरण करा"



**प्रतिनिधी :** नालासोपारा नगरपरिषदेच्या काळात अपंगांना स्वयंरोजगारासाठी मंजूर करण्यात आलेल्या स्टॉल्सचे परवाने नूतनीकरण करावेत आणि तोडक कारवाई थांबवावी, या प्रमुख मागण्यांसाठी राष्ट्रीय अपंग विकास महासंघ व इतर अपंग कल्याणकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांनी वसई-विरार महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

२००० साली नालासोपारा नगरपरिषदेने अपंगांना स्वयंरोजगाराची संधी देण्यासाठी विशेष समिती नेमली होती. समितीने ४२ अर्जांची छाननी करून ३५ दिव्यांगांना नियमावलीनुसार स्टॉल मंजूर केले होते. यापैकी वाघोली, सोपारा, तुळींज, पेल्हार परिसरातील १२ अपंगांना मुख्य रस्त्यांवर ४x६ फूट आकाराचे स्टॉल देण्यात आले होते. त्याकाळात स्टॉलधारकांकडून नियमित भाडेही आकारले जात होते.

मात्र २०१६ मध्ये वसई-विरार महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर भाडे आकारणी बंद झाली आणि आता त्याच स्टॉल्सना "अनधिकृत" ठरवून तोडक कारवाई सुरु झाली आहे. अलिकडेच नालासोपारा येथील अपंग स्टॉलधारक नितीन तोड तोडणकर यांचा स्टॉल महापालिकेच्या पथकाने कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस न देता उद्ध्वस्त केला. यामुळे संतापलेल्या अपंगांनी आज महापालिका आवारात ठिय्या आंदोलन उभारले.

राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे राज्य

पान क्र. ८ वर


## साप्ताहिक जनतेचा लोकमानस आपल्या घरी येत नाही ???



आजच आमचे सभासद व्हा आणि आपल्या घरी साप्ताहिक जनतेचा लोकमानस मागवा फक्त वार्षिक रु. 90/- मध्ये खालील google form (https://forms.gle/9apSyBTPfMnnW31A7) भरून आम्हाला पाठवा.
आणि आपल्या अंकाची आजच नोंदणी करा.
अधिक माहितीसाठी आम्हाला संपर्क करा. 9082067601




## मोफत वाढदिवसाच्या जाहिराती प्रसिध्द करा

१ ते ५ वर्षाच्या लहान मुलांच्या वाढदिवसाच्या जाहिराती आता आपल्या वृत्तपत्रात मोफत प्रसिध्द करा

काय करावे ???

आपल्या मुला-मुलींचे फोटो त्यांच्या वाढदिवसाच्या १५ दिवस अगोदर नाव, पत्ता, जन्म दिनांक खालील व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवा

9082067601



जनतेचा लोकमानस
ADVERTISEMENT RATE CHART
valid from Nov. 2025

### CLASSIFIED ADS



**Rate :** Rs. 50/- for 20 Words
**Extra World :** Rs. 2/- Each
**Scheme :** 4 Paid + 2 Free, 8 Paid + 5 Free, 16 Paid + 35 Free

### CLASSIFIED DISPLAY



**Rate :** Rs. 30/- per sq.cm
**Min Size :** 6 X 5
**Min Amount :** Rs. 900/-
**Scheme :** 3 Paid + 1 Free, 6 Paid + 3 Free, 12 Paid + 25 Free

FREE Website in Advertising Section Facebook Post

### DISPLAY ADS



| FRONT PAGE | BACK PAGE | PANEL AD |
|---|---|---|
| Rs. 150/- per sq.cm<br>Min Size 6 X 5<br>Min Rs. 4500/- | Rs. 125/- per sq.cm<br>Min Size 6 X 5<br>Min Rs. 3750/- | Rs. 8000/- per Panel<br>Size 8cm X 4cm |
| **PAGE 3** | **INSIDE PAGE** | |
| Rs. 90/- per sq.cm<br>Min Size 6 X 5<br>Min Rs. 2700/- | Rs. 75/- per sq.cm<br>Min Size 6 X 5<br>Min Rs. 2250/- | FREE Website & Facebook Post |

ads@jantechalokmanas.com
9082067601
Room No 2303, Building No 4, D Wing, MHADA Colony, Virar Nalasopara Link Road, Virar West - 401303.
www.jantechalokmanas.com JantechaLokmanas @JantechaLokmanas

# सामाजिक कार्यासाठी सतत सक्रिय असणाऱ्या नालासोपाराचे आमदार राजन नाईक यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



**प्रतिनिधी :** नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजन बालकृष्ण नाईक यांचा ११ डिसेंबर रोजी ६१ वा वाढदिवस भाजपा कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. भाजपच्या या ज्येष्ठ नेत्याने गेल्या काही वर्षांत स्थानिक विकास, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण यासाठी अविरत प्रयत्न केले आहेत. नाईक यांच्या नेतृत्वाखाली नालासोपारा परिसरात रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडवले गेले आहेत. वाढदिवसानिमित्त स्थानिक कार्यकर्ते, नागरिक आणि भाजप पदाधिकारी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उत्साहित आहेत.

राजन नाईक हे मूळचे भूमिपुत्र आहेत. त्यांचे वडील बालकृष्ण गणपत नाईक हे स्थानिक समाजसेवक होते. नाईक यांनी बी.कॉम पदवी प्राप्त केल्यानंतर जमीन विकास, बांधकाम आणि पेट्रोल पंप व्यवसायात यश मिळवले. राजकारणात पदार्पणापूर्वी ते नालासोपारा आणि वसई-विरार परिसरात सामाजिक कार्यासाठी ओळखले जात होते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपकडून उमेदवारी घेऊन ते नालासोपारा मतदारसंघातून लढले, ज्यात त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र, बहुजन विकास आघाडीच्या (बविआ) प्राबल्यामुळे ते विजयी झाले नाहीत.

२०१९ च्या निवडणुकीतही त्यांनी जोरदार लढा दिला, पण पुन्हा बविआच्या क्षितिज ठाकूर यांच्याविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला. मात्र, सततच्या अथक प्रयत्नांनी त्यांची लोकप्रियता वाढत गेली. २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत नाईक यांनी ऐतिहासिक यश मिळवले. बविआच्या दीर्घकाळाच्या वर्चस्वाला आव्हान देत त्यांनी १,६५,११३ मतांच्या फरकाने विजय मिळवला. भाजपच्या या यशाने नालासोपारा आणि पालघर जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नाईक यांनी निवडणूक लढवताना विकासाच्या मुद्द्यांवर भर दिला, ज्यामुळे मतदारांनी त्यांना भरभरून साथ दिली.

आमदार म्हणून नाईक यांनी नालासोपारा परिसरातील ४१ इमारतींच्या हद्दपार प्रकरणावर तात्काळ कारवाई करून नागरिकांना दिलासा दिला. तसेच, रस्ते दुरुस्ती, ड्रेनेज सिस्टम सुधारणा, महिला आणि बालकल्याण योजना आणि बेरोजगार तरुणांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवले.

वाढदिवसानिमित्त नालासोपारा येथे स्नेहमेळावा आणि सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नाईक यांच्या कार्याचा आदर म्हणून विविध संघटना आणि नागरिकांकडून शुभेच्छा चे फलक लावण्यात आले.

नालासोपारा मतदारसंघातील विकासासाठी समर्पित असलेल्या राजन नाईक यांना जनतेचा लोकमानस आणि ग्राहक सेवा संस्था यांच्या वतीने वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या नेतृत्वात परिसर अधिक समृद्ध होण्याची अपेक्षा आहे.

## रॅपिडो ॲपद्वारे वसई-विरारमध्ये अवैध बाईक टॅक्सी सेवा ;

पान क्र. १ वरून

सुरू असल्याचे आढळले. यानंतर जानेवारी २०२५ मध्ये राज्य परिवहनमंत्री प्रताप सरणाईक यांनी ओला, उबर, रॅपिडो सारख्या ॲप-आधारित सेवांसाठी एकच नियामक यंत्रणा उभारण्याची घोषणा केली होती. मात्र, अद्याप पूर्ण अंमलबजावणी झालेली नाही, ज्यामुळे अशा सेवा बिनधास्त चालू आहेत.

**स्थानिक चालकांचा विरोध आणि आंदोलने**

वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात रॅपिडोच्या सेवेमुळे स्थानिक ऑटो, रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. जुलै २०२५ मध्ये ओला-उबर-रॅपिडो चालकांनीच भाडेवाढीसाठी आंदोलन केले होते, पण आता पारंपरिक चालक रॅपिडोविरोधात एकत्र येत आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेत्यांनी नुकतेच (८ डिसेंबर २०२५) प्रशासनाकडे कारवाईची मागणी केली असून, बाईक टॅक्सींवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली आहे. मनसे नेते म्हणाले, या सेवांमुळे रस्त्यांवर अनधिकृत वाहतूक वाढली असून, प्रवाशांचा जीव धोक्यात आहे.

**प्रवाशांसाठी धोका आणि उपाययोजना**

रॅपिडोच्या बाईक टॅक्सींमध्ये हेल्मेट, विमा किंवा सुरक्षिततेची कोणतीही हमी नसल्याने अपघात झाल्यास प्रवाशांना नुकसान भरपाई मिळणे कठीण आहे. परिवहन विभागाने आवाहन केले आहे की, नागरिक रॅपिडो किंवा अशा अवैध सेवांचा वापर करू नये. पर्याय म्हणून, अधिकृत ऑटो-रिक्शा किंवा सरकारी ॲप्सचा वापर करावा. तक्रारींसाठी वसई आरटीओ हेल्पलाइन (०२५०-२४०००००) वर संपर्क साधावा.

राज्य सरकारकडून आता एकसमान धोरण आखण्याची चर्चा सुरू आहे, ज्यात ॲप-आधारित सेवांसाठी केंद्रीकृत परवानगी प्रक्रिया येईल. मात्र, सध्या वसई-विरारमध्ये ही सेवा बंद करण्यासाठी पोलिस आणि आरटीओ संयुक्त तपास करत आहेत.

## ग्राहक सेवा संस्थेच्या वतीने भव्य सदस्य नोंदणी अभियान

ग्राहक सेवा संस्था
ग्राहक हिताय। ग्राहक समाधान।।

**प्रतिनिधी :** ग्राहकांच्या न्याय हक्कासाठी लढणारी स्वयंसेवी संघटना ग्राहक सेवा संस्थेच्या वतीने भव्य सदस्य नोंदणीचे आभियान चालविले आहे.

सदर संस्था संपूर्ण महाराष्ट्रभर काम करीत असून त्यांनी ग्राहकांचे मूलभूत हक्क आणि अधिकारांचे रक्षण करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे लढा दिला आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांचे शेकडो सभासद असून ग्राहकांच्या हक्कांची जनजागृती व्हावी यासाठी त्यांनी भव्य सदस्य नोंदणी चे आवाहन केले आहे.

या नोंदणी अभियानामध्ये सर्व समाजाप्रती सूज्ञ नागरिकांचा समावेश करण्यात येत असून ज्यांना या संस्थेमध्ये नोंदणी करावयाची आहे त्यांनी ७०२८५८६८७९ या व्हॉट्सअप क्रमांकावर आपले नाव, वय, जन्म दिनांक, लिंग, आणि राहण्याचा पत्ता पाठवावा तसेच आपण ज्या कार्यक्षेत्रामध्ये काम करता त्या बाबतची माहिती द्यावी असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गितेंद्र मिर्लेकर यांनी केले आहे.

## वसईत ज्वेलर्स दुकानदारावर जीवघेणा हल्ला




**प्रतिनिधी :** वसईमध्ये दुपारच्या सुमारास ज्वेलर्स दुकानाच्या मालकावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात अंबिका ज्वेलर्सचे मालक कालू सिंह गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वारंवार घडत असलेल्या अशा घटनांमुळे वसई विरारमधील कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

वसई पूर्व, वालीव येथील जय नगर परिसरात सदरची घटना घडली. रोजच्या प्रमाणे दुकान उघडल्यानंतर दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एक अज्ञात युवक दुकानात शिरला आणि काहीही कळण्यापुर्वी कालू सिंह यांच्यावर चाकूने सपासप वार केले. हल्ला इतका अचानक होता की दुकानदाराला स्वतःचा बचाव करण्याची संधीही मिळाली नाही. हल्ल्यानंतर आरोपी

पान क्र. ७ वर

# नालासोपारा पूर्वेत अवैध पिस्तूल व काडतुसे बाळगणाऱ्या दोघांना अटक; ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी :** नालासोपारा पूर्वेतील धानीव बाग तलावाजवळ चिमा पाटील शिक्षण संस्थेच्या मुख्य द्वारासमोर गुन्हे शाखा युनिट-२, वसईच्या पथकाने सापळा रचून अवैध पिस्तूल व काडतुसे बाळगणाऱ्या दोघांना अटक केली. या कारवाईत ५०,६०० रुपयांचे एक देशी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. ही कारवाई ५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली असून, आरोपींना पेल्हार पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले आहे.

गुन्हे शाखा युनिट-२ चे अधिकारी व कर्मचारी नालासोपारा पूर्व परिसरात गस्त घालत असताना, सहाय्यक फौजदार मनोज नारायण मोरे यांना गुप्त माहिती मिळाली की, एक संशयित धानीव बाग तलाव ते चिमा पाटील शाळेच्या रस्त्यावर अवैध शस्त्र घेऊन येणार आहे. पथकाने सापळा रचून संशयित नसरुद्दिन मोहम्मद शरीफ खान (वय ३१, रा. नालासोपारा पूर्व) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदाराचे नाव सांगितले, ज्यानंतर क्रिष्णा रामचंद्र चव्हाण (वय ३१, रा. सातिवली, वसई पूर्व) यालाही अटक करण्यात आली.

**आरोपींची नावे:**

नसरुद्दिन मोहम्मद शरीफ खान (वय ३१, रा. नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर), क्रिष्णा रामचंद्र चव्हाण (वय ३१, रा. सातिवली, वसई पूर्व)

**आरोपी नसरुद्दिन खानचा पूर्व इतिहास:**

वाल्मीक पोलीस ठाणे: गु.र.क्र. ५४८/२०२५ कलम ४५२, १४३, १४७, ४२७ सह म.पो.का. ३७(१), १३५

पेल्हार पोलीस ठाणे: गु.र.क्र. ४२४/२०२४ कलम ३२६, ५०४, ५०६, ३४

या प्रकरणी सहाय्यक फौजदार मनोज मोरे यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ६९९/२०२५ भा.ह.का. कलम ३, २५, २७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना पेल्हार पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले असून, पुढील तपास पेल्हार पोलीस करत आहेत. यात अपर पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे, पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ वसई युनिटचे पोलीस निरीक्षक रविराज कुराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील सहाय्यक फौजदार संजय नवले, मुकेश पवार, रवींद्र पवार, मनोज मोरे, चंदन मोरे, पोलीस हवालदार प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, राहुल करपे, प्रशांत ठाकूर, दिलीप शेख, पोअं ऑनिल साबळे, संतोष चव्हाण, सायबर शाखा, म.भा.वि. यांचा समावेश आहे.

# कर्जबाजारीपणामुळे ३५ वर्षीय तरुणाने स्वतःला पेटविले



**प्रतिनिधी :** विरार पूर्वेकडील फूलपाडा परिसरात रविवारी मध्यरात्री १२.४० वाजता कर्जाच्या ओझ्याने ग्रासलेल्या ३५ वर्षीय व्यक्तीने स्वतःवर ज्वलनशील पदार्थ ओतून आग लावून घेतली. या घटनेत त्याचा मृत्यू झाला, तर त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याची पत्नी व भाचा देखील भाजले.

मृत व्यक्तीचे नाव अखिलेश विश्वकर्मा (वय ३५, रा. फूलपाडा, विरार पूर्व) असे आहे. तो स्थानिक भागात वेल्डिंगचे दुकान चालवत होता. अखिलेश गेल्या काही महिन्यांपासून कर्ज आणि पैशांच्या समस्येमुळे तणावात व डिप्रेशनमध्ये होता. आणि त्याच तणावाखाली त्याने स्वतःवर पेट्रोलसदृश ज्वलनशील पदार्थ ओतून आग लावली. आरडाओरडा ऐकून पत्नी व त्याचा भाचा आग विझविण्यासाठी धावले असता त्यांनाही आग लागली. पत्नीला किरकोळ भाजले असून, भाचा मात्र गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. अखिलेशचा मृतदेह शवचिकित्सेसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, विरार पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे व पुढील तपास सुरु आहे.

# वसईत ज्वेलर्स दुकानदारावर जीवघेणा हल्ला

**पान क्र. ६ वरून**

तत्काळ पसार झाला.

रक्तबंबाळ अवस्थेत कालू सिंह यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. गजबजलेल्या परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

घटनेची माहिती मिळताच वालीव पोलीस, गुन्हे शाखा आणि परिमंडल-२ च्या डीसीपी पौर्णिमा चौगुले-श्रींगी तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. डीसीपी चौगुले-श्रींगी यांनी सांगितले, “आरोपीच्या शोधासाठी नाकाबंदी करण्यात आली आहे. विशेष तपास पथक तयार करण्यात आले असून आरोपीला लवकरच अटक केली जाईल.”पोलिसांनी या गंभीर हल्ल्याचा तपास सर्व दृष्टीकोनातून सुरू केला आहे. विशेष म्हणजे, हल्लेखोराने दुकानातून कोणतीही चोरी केली नाही म्हणून पोलिसांनी प्राथमिक तपासात वैयक्तिक कारण असल्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# न्याय मागायला पोलीस ठाण्यात गेलेल्या तरुणीवर हवालदाराकडूनच बलात्कार; कासा पोलीस ठाण्यातील संतापजनक प्रकार




**प्रतिनिधी :** डहाणू तालुक्यातील कासा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या २१ वर्षीय तरुणीवर पोलीस हवालदार शरद भोगाडे (वय ४१) याने बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी हवालदाराला अटक करण्यात आली असून, प्रकरणाची गंभीर दखल घेत घटनेची पालघर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी तत्परता दाखवत डहाणू पोलीस ठाण्यात शून्य क्रमांकाने गुन्हा नोंदवला. आरोपी हवालदार शरद बोगाडे याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचारासह बलात्कार, धमकी आणि पदाचा गैरवापर या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, २५ ऑक्टोबर रोजी एका विवाहित महिलेच्या तक्रारीवरून (तिचा पती दुसऱ्या मुलीसोबत राहत असल्याची) चौकशी सुरू होती. या चौकशीदरम्यान हवालदार शरद भोगाडे याने संबंधित २१ वर्षीय तरुणीला वारंवार पोलीस ठाण्यात बोलावले. “मदत करतो, तुझी तक्रार मार्गी लावतो” असे सांगत त्याने तरुणीचा विश्वास संपादन केला. २९ नोव्हेंबर रोजी रात्री पुन्हा चौकशीच्या बहाण्याने बोलावून भोगाडे याने तिला पोलीस ठाण्याच्या मागे असलेल्या पोलिस वसाहतीतील एका खोलीत नेऊन तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. भीतीमुळे तरुणी गप्प राहिली; मात्र ७ डिसेंबर रोजी धैर्य एकवटून तिने डहाणू पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

डहाणू पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून प्रकरण कासा पोलिसांकडे वर्ग केले. त्याच रात्री ११ वाजता आरोपी हवालदार शरद भोगाडे याला अटक करण्यात आली. त्याच्यावर पोक्सो आणि विविध कमलांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकरण उघडकीस आल्यानंतर संताप व्यक्त होत असून, पोलीस दलाची प्रतिमा मलिन झाली आहे. पोलिस अधीक्षकांनी तात्काळ ठाणेदारांची बदली करून प्रकरणाचा तपास गतीमान केला आहे. पीडित तरुणीला वैद्यकीय व मानसिक आधार देण्यात येत आहे.

# भटक्या कुत्र्यांचा धोका वाढला; गेल्या सहा वर्षांत राज्यात ३० लाखांहून अधिक चाव्याच्या घटना, एकट्या पालघरमध्ये १४ जणांचा रेबीजने मृत्यू



**प्रतिनिधी** : महाराष्ट्रात भटक्या कुत्र्यांच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. राज्यात गेल्या सहा वर्षांत (२०१९ ते २०२५) भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या ३० लाख ४० हजारांहून अधिक घटनांची नोंद झाली आहे. यापैकी फक्त २०२१ ते २३ या तीन वर्षांत रेबीज (कुत्र्यांचा वेडेपणा) या जीवघेण्या आजाराने तब्बल ३० जणांना प्राण गमवावे लागले आहेत.

आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, दरवर्षी सरासरी ५ लाखांहून अधिक नागरिक कुत्र्यांच्या चाव्याने जखमी होतात. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, पालघर, नालासोपारा-विरार या शहरी व उपनगरीय भागांत या घटना सर्वाधिक आहेत. विशेष म्हणजे, चाव्यानंतर वेळेवर अँटी-रेबीज लस (ARV) व इम्युनोग्लोबुलिन इंजेक्शन न मिळाल्यास रेबीजचा धोका प्रचंड वाढतो.

**पालघर जिल्ह्यातही चिंताजनक स्थिती**

राज्य सरकारच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये महाराष्ट्रात रेबीजमुळे ५४ मृत्यू झाले, यापैकी १४ मृत्यू फक्त पालघर जिल्ह्यात झाले आहेत. हे राज्यातील एकूण मृत्यूंच्या २६% आहे. गेल्या सहा वर्षांत (२०१९-२०२५) जिल्ह्यात १ लाख १० हजारांहून अधिक कुत्राचाव्याच्या घटना नोंदवल्या गेल्या असून, २०२१-२०२३ या काळात ३० जणांना प्राण गमवावे लागले. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात दर महिन्याला सरासरी १,२०० ते १,५०० नागरिक कुत्र्यांच्या चाव्याने जखमी होतात. येथील रुग्णालयांत अँटी-रेबीज लसीचा तुटवडा आणि महागड्या इंजेक्शनचा खर्च यामुळे अनेकांना वेळेवर उपचार मिळत नाहीत.

सरकारने २०२३ मध्ये भटक्या कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण मोहीम तीव्र केली असली तरी, राज्यात सुमारे २५ ते ३० लाख भटकी कुत्री असल्याचा अंदाज आहे. महापालिका व ग्रामपंचायतींकडे पुरेसे मनुष्यबळ व निधी नसल्याने मोहीम मंदावली आहे.

**तज्ज्ञांचे मत**

प्राणी कल्याण तज्ज्ञ डॉ. दीपक सावंत म्हणाले म्हणाले, कुत्राचाव्याच्या घटना कमी करण्यासाठी फक्त नसबंदी नव्हे तर भटक्या कुत्र्यांसाठी मोठ्या प्रमाणात आश्रयगृहे (शेल्टर्स) उभारणे गरजेचे आहे. तसेच नागरिकांनी चावल्यानंतर तात्काळ जखम धुवून २४ तासांत अँटी-रेबीज लस घ्यावी.

**सरकारकडून उपाययोजना**

राज्य सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी व लसीकरणासाठी १५० कोटींची तरतूद केली आहे.

प्रत्येक जिल्ह्यात १०० कुत्र्यांची क्षमता असलेले किमान दोन आश्रयगृहे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

महापालिकांना सक्तीचे ABC (Animal Birth Control) कार्यक्रम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

मात्र, नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रत्यक्षात जमिनीवर काम फारच कमी दिसते. दरम्यान, भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यातील वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक यांना याचा सर्वाधिक फटका बसतो आहे.

# अपंग विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणात विशेष शिक्षकांचे योगदान अमूल्य - जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड

**प्रतिनिधी** : "सर्वसामान्य मुलांना सांभाळणे आजच्या पालकांना कठीण वाटते, मग अपंगत्व असलेल्या मुलांना मुख्य प्रवाहात आणणारे विशेष शिक्षक किती मोठे परिश्रम घेतात, हे शब्दांत व्यक्त करता येणार नाही. अपंग विद्यार्थ्यांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवण्यात विशेष शिक्षकांचे योगदान कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे," असे प्रतिपादन पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी केले.

जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण व अपंग कल्याण विभागातर्फे पालघर येथे जिल्हास्तरीय अपंग विद्यार्थी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. जाखड यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, उपजिल्हाधिकारी व्यंकटराव हुंडेकर, वित्त अधिकारी सचिन कवठे, अपंग कल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभा राऊळ आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्ह्यातील १६ विशेष शाळांमधून सुमारे २५० हून अधिक अपंग विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली आणि क्रीडा ज्योत प्रज्वलित केली. धावणे, लांब उडी, गोळाफेक, स्पून रेस, बॉल थ्रो अशा विविध क्रीडाप्रकारांत अपंग विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवले.




मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे म्हणाले, "या स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना आणि जय-पराजय स्वीकारण्याची मानसिकता निर्माण करतात. पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी मिळवलेले यश पाहता, आपल्या जिल्ह्यातील मुलेही त्या स्तरावर पोहोचू शकतात, यासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत."

कार्यक्रमात कर्णबधिर व मूकबधिर विद्यार्थ्यांच्या पूर्वी झालेल्या स्पर्धेतील विजेत्यांचे बक्षीस वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सेस फंडातून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्हा परिषदेचे आभार मानले जात आहेत.

अपंग विद्यार्थ्यांच्या या उत्साही सहभागाने आणि विशेष शिक्षकांच्या अथक परिश्रमाने संपूर्ण क्रीडा नगरी भारावून गेली होती.

## अपंग स्टॉलधारकांचे महापालिका आवारात ठिय्या आंदोलन;

**पान क्र. ५ वरून**

उपाध्यक्ष दीपक घाग म्हणाले, "नगरपरिषदेने कायदेशीररित्या मंजूर केलेले स्टॉल आज महापालिकेला अनधिकृत का वाटतात? आमचे परवाने नूतनीकरण करा आणि तोडक कारवाई तात्काळ थांबवा."

अपंग कल्याणकारी संस्थेचे पालघर समन्वयक राजेश निजाई यांनी सांगितले, "दीड महिना आधीच याबाबत लेखी अर्ज दिला होता, तरी कारवाई झाली नाही. आज आंदोलन करावे लागले."

महापालिकेच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी आंदोलकांना आश्वासन दिले की, "प्रभाग डी"च्या अधिकाऱ्यांना कारवाई थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. पीडित स्टॉलधारकांची सर्व कागदपत्रे तपासली जातील आणि लवकरच योग्य तोडगा काढला जाईल." आंदोलकांनी मात्र आश्वासनांवर समाधान न मानता लेखी आदेश मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.